दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १६ वे • अंक ७६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.९ जून २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

कोरोनावरील लसींच्या ७४ कोटी डोसची दिली ऑर्डर

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

करोनाची तिसरी लाट कधी येणार? मुलांवर तिचा परिणाम होणार का? या प्रश्नांवर दिल्लीतील एम्सचे संचालक डॉ. रणदीप गुलेरिया यांनी उत्तर दिलं. अनलॉकिंगसह नागरिकांचे वर्तन बदलल्या पुन्हा नवी लाट तयार होते, असं गुलेरिया म्हणाले. लहान मुलांशी संबंधित कुठलाही डाटा आतापर्यंत उपलब्ध नाही. मुलांवर परिणाम होईल, अशी कुठलीही माहिती जागतिक स्तरावरही नाहीए. याचा कोणताही पुरवा नाहीए, असं गुलेरिया यांनी स्पष्ट केलं. तर केंद्र सरकारने करोनावरील लसींच्या ७४ कोटी डोस खरेदीची ऑर्डर दिल्याची माहिती नीती आयोगाचे सदस्य डॉ. व्ही. के. पॉल यांनी दिली. मुलांमध्ये करोनाचा गंभीर संसर्ग झाल्याचा कुठलाही डाटा जगभरात उपलब्ध नाहीए. जागतिक डाटा पाहता मुलांना करोनाच्या पुढील लाटेत धोका असल्याचं सांगता येणार नाही, असं गुलेरिया म्हणाले. पुढची लाट रोखण्यासाठी (कोविडपासून बचावासाठी अनुकूल वर्तन) गरजेचं आहे, असं त्यांनी सांगितलं.

आरक्षणाबाबत ५० टक्क्यांची मर्यादा शिथिल करा ; मुख्यमंत्र्यांची पंतप्रधानांकडे मागणी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीसाठी आज (मंगळवारी) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे दिल्ली दौऱ्यावर आहेत. सकाळी ११.00 वाजता सुरू झालेली ही बैठक जवळपास तासभर सुरू होती. या भेटीदरम्यान मुख्यमंत्र्यांसोबत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मराठा आरक्षण समिती उपप्रमुख आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण हेदेखील उपस्थित होते. या बैठकीनंतर महाराष्ट्र सदनात घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यासंबंधी माहिती दिलीय.

पंतप्रधानांच्या भेटीनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, अजित पवार आणि अशोक चव्हाण यांनी महाराष्ट्र सदनातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून वंदन केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत ही एक अधिकृत बैठक होती. सगळे विषय पंतप्रधानांनी गांभीर्याने ऐकून घेतले, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी या बैठकीबद्दल अधिक माहिती दिली.

पंतप्रधानांसोबतच्या आजच्या भेटीवर महाआघाडीचे तीनही नेते समाधानी आहेत. आजच्या भेटीमध्ये कुठलाही राजकीय अभिनिवेश नव्हता. शांतपणे आणि समजूतदारपणे वेगवेगळ्या विषयांवर पंतप्रधानांसोबत चर्चा झाली असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलंय. तसंच १८ वर्षांवरील नागरिकांना मोफत लशीची घोषणा करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मुख्यमंत्र्यांनी मानले आहेत.

या भेटीदरम्यान मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान मोदींची वैयक्तिकरित्या ३० मिनिटे भेट घेतली. 'सत्तेत एकत्र नाहीत याचा अर्थ नातं तुटलं असा होत नाही. या भेटीत वावगं काहीच नाही. मी काही नवाझ शरीफ यांच्या भेटीसाठी गेलो नव्हतो', असंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलंय.

मराठा आरक्षण, ओबीसी राजकीय आरक्षण, पदोन्नतीतील आरक्षण, जीएसटी परतावा, कांजूरमार्ग इथल्या मेट्रो कारशेडसाठी जागेची उपलब्धता, पीक विमा, तौक्ते वादळामुळे झालेल्या नुकसानीसाठी मदतीचे निकष बदलणे अशा विविध विषयांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी सविस्तर चर्चा झाली, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलंय. शिवाय, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याबाबतही पंतप्रधानांशी झालेल्या भेटीदरम्यान चर्चा झाल्याचं मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी म्हटलंय. या भेटीत आरक्षणा संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातले महत्त्वाचे मुद्दे पंतप्रधान मोदींच्या निदर्शनास आणून दिले. तसंच आरक्षणाबाबत ५० टक्क्यांची मर्यादा शिथिल करावी, अशी मागणी पंतप्रधानांकडे केल्याचं काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी म्हटलंय. पीक विम्यासाठी बीड पॅटर्न राबवण्याची तसंच २४ हजार ३०६ कोटींचा जीएसटी परतावा महाराष्ट्राला लवकरात लवकर परत करावा, अशी मागणी महाराष्ट्र सरकारनं पंतप्रधानांकडे केल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलंय. १४ व्या वित्त आयोगातील थकीत १,४४४ कोटींचा निधी तत्काळ राज्याला मिळावा अशीही मागणी केंद्राकडे करण्यात आलीय.

संक्षिप्त...

नवनीत कौर राणा यांचं जात प्रमाणपत्र हाय कोर्टाकडून रद्द

दै.रायगड नगरी । मुंबई

अमरावतीच्या खासदार नवनीत कौर राणा यांना मोठा धक्का बसला आहे. राणा यांचं जात प्रमाणपत्र मुंबई उच्च न्यायालयानं रद्द केलं आहे.

न्यायमूर्ती बिश्त आणि धनुका यांच्या खंडपीठानं हा निकाल दिला. राणा यांनी २०१९ ची लोकसभा निवडणूक जिंकली होती. मात्र त्यांच्या जात प्रमाणपत्राविरोधात शिवसेनेचे नेते आणि माजी खासदार आनंदराव अडसूळ उच्च न्यायालयात गेले होते. अडसूळांच्या याचिकेवर आज मुंबई उच्च न्यायालयानं निकाल दिला.

२०१३ मध्ये नवनीत कौर यांचा विवाह रवी राणा यांच्याशी झाला. त्यानंतर त्यांनी अनुसूचित जातीचं प्रमाणपत्र मिळवलं. त्याची पडताळणी करण्यात आली होती. या प्रमाणपत्राविरोधात २०१७ मध्ये शिवसेनेचे नेते आनंदराव अडसूळ यांनी याचिका दाखल केली. त्यानंतर न्यायालयानं जात प्रमाणपत्र पुन्हा पडताळणीसाठी पाठवलं. याच जात प्रमाणपत्राच्या आधारे राणा यांनी २०१९ मध्ये लोकसभा निवडणूक लढवली. त्यात त्यांनी अडसूळ यांचा पराभव केला.

आनंदराव अडसूळ यांनी राणा यांच्या जात प्रमाणपत्राविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. आज त्यावर निकाल सुनावण्यात आला. बिश्त आणि धनुका यांच्या खंडपीठानं कौर यांचं जात प्रमाणपत्र रद्द केलं. याशिवाय त्यांना २ लाखांचा दंडदेखील ठोठावला. २०१९ मध्ये ज्या प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूक लढवली, तेच प्रमाणपत्र आता रद्द झाल्यानं राणा यांची खासदारकी धोक्यात आली आहे.

स्व.पत्रकार वचन गायकवाड यांना पनवेलमधील पत्रकारांनी वाहिली श्रद्धांजली

कुटुंबाने एक कर्ता पुरुष गमावल्याने त्यांच्या पाठीशी पनवेलमधील पत्रकार एकवटले

दै.रायगड नगरी । पनवेल

पत्रकारिता क्षेत्रात काम करीत असताना शासनाच्या सुविधांपासून अनेक पत्रकारांना वंचित राहावे लागत आहे, त्यातच पत्रकारितेच्या वेडामध्ये काम करीत असताना स्वतःचा जीव धोक्यात घालून नवनवीन बातम्या शोधून वाचकांसमोर त्या बातमीचा जिवंतपणा द्यावा लागतो. सध्या कोरोनाचा प्रसार वाढल्याने पत्रकारांच्या जीवावर तो बेतत आहे. पनवेल तालुक्यातील एक जागृत पत्रकार वचन गायकवाड यांनाही कोरोनाने आपल्या विळख्यात घेतलं, आणि पनवेलच्या पत्रकारांमधून अचानक एक्झिट घेतली.

वचन गायकवाड यांच्या जाण्याने पनवेल तालुक्यातील पत्रकार एकवटले आणि त्यांनी वचन गायकवाड यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी तालुक्यातील सर्व पत्रकारांनी एकत्र येऊन वचन गायकवाड यांच्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी मदत करण्याचा निर्धार केला. एक सच्चा दोस्त सहकारी गमावल्याचे दुःख यावेळी जेष्ठ पत्रकारांनी व्यक्त केले. वचन गायकवाड यांच्या अचानक जाण्याने पनवेल तालुक्यातील राजकीय, सामाजिक क्षेत्रासह तळोजा परिसरातील औद्योगिक क्षेत्रातूनही दुःख व्यक्त करण्यात आले आहे. वचन गायकवाड यांच्या कुटुंबाच्या दुःखात पनवेलमधील सर्व पत्रकार सहभागी असून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने वचन गायकवाड यांच्या कुटुंबासाठी पत्रकार एकवटले आहेत. यावेळी अधिकाधिक मदत त्यांच्या कुटुंबापर्यंत पोहोचविण्याचा निश्चय उपस्थित सर्व पत्रकारांनी केला.

यावेळी शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेला जेष्ठ पत्रकार सुनील पोतदार, जेष्ठ पत्रकार माधवराव पाटील, जेष्ठ पत्रकार विजय कडू, यांच्यासह पत्रकार रमेश भोळे, गणेश कोळी, मंदार दोंदे, विवेक पाटील, रत्नाकर पाटील, निलेश सोनावणे, सय्यद अकबर, संजय कदम, अनिल भोळे, दीपक महाडिक, अरविंद पोतदार, मयूर तांबडे, राज भंडारी, राकेश पितळे, के.सी.सिंग, लक्ष्मण ठाकूर, बाळू जुमलेदार, सुमंत नलावडे, अविनाश जगधने, नितीन देशमुख, राजेश डांगळे, संतोष भगत, विशाल मनोहर सावंत, विशाल रावसाहेब सावंत, विजय पवार, साहिल रेळेकर, दीपक घोसाळकर, दत्ता मोकल, अनिल कुरघोडे, सुभाष वाघपंजे, सुधीर पाटील, भरतकुमार कांबळे, नंदकिशोर धोत्रे, मल्हारी पाटील आदींसह पत्रकार बांधव उपस्थित होते.

> कोरोना महामारीमध्ये मृत पावलेल्या पत्रकारांना त्यामध्ये केवळ अधिस्वीकृती पत्रकारच नव्हे तर सर्व पत्रकारांना केंद्र सरकारने २५ लाखाची तर राज्य सरकारने १५ लाखांची मदत जाहीर करावी. त्याचप्रमाणे त्यांच्या कुटुंबियांना दरमहा १० हजार रुपये पेन्शन स्वरुपात द्यावेत.
>
> : **सुनील पोतदार, ज्येष्ठ पत्रकार**

पेण शहरातील धोकादायक इमारती सिल ; पेण नगरपरिषदेची कारवाई

दै.रायगड नगरी । पेण

पावसात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे धोकादायक इमारती पडून त्यामध्ये हकनाक कोणाचाही बळी जाऊ नये यादृष्टीने पेण नगरपरिषदेने धडक कारवाई करत शहरातील अनेक धोकादायक इमारतींना सील ठोकले आहे.

पेण शहरातील अवंती वेल्डिंग, दामगुडे आळी येथील एक निवासी घर, भगवानदास स्टेशनरी समोरील सुरेश शहा यांचे प्रभात स्टेशनरी स्टोअर्स, आशा निवास बिल्डिंग, झिराळआळी येथील झेमसे-शिंदे वाडा, तरे आळी येथील यशोदा कडू यांचे निवासस्थान, आरटीओ कार्यालयासमोरील महावीर बिल्डिंग, उत्कर्ष नगर येथील मोनार्क अपार्टमेन्ट इमारत, रामवाडी येथील नारायण म्हात्रे यांचे घर आदी अनेक धोकादायक घर व ..../२

लोहारमाळ नजिकच्या मोरीवरून कार नाल्यात पडली

दै.रायगड नगरी । पोलादपूर

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर लोहारमाळ येथील बांधावरच्या बाबासमोरील मोरीवरून एक भरधाव कार नाल्यात पडून अपघात झाल्याची घटना मंगळवारी पहाटे घडली. वीर ते कातळीबंगलादरम्यानच्या एलॲण्डटी या ठेकेदार कंपनीने या मोरीवर कठडे न बांधल्यानेच हा अपघात झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यात सध्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरू असून यामध्ये फ्लायओव्हर, सर्व्हीस रोड, अंडरपास, संरक्षक भिंती, संरक्षक कठडे, साईडपट्ट्या, बॉक्सकटींग असे प्रकार सुरू आहेत. सर्वच कामे अर्धवट स्थितीत असताना पोलादपूर तालुक्यात जोरदार पाऊस सुरू झाल्याने या कामांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. लोहारमाळ ते पार्ले दरम्यानच्या बांधावरच्या बाबा उर्फ बांदलबाबा तसेच आईसाहेब हॉटेल याठिकाणी मंगळवारी पहाटेच्या सुमारास एक कार रस्त्यावरील ..../२

कळंबोलीतील उद्यानाचे वाहनतळ करण्याची मागणी ; उद्यान अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

दै.रायगड नगरी । कळंबोली

करोना महामारीच्या संकटात ऑक्सीजनचे महत्व सर्वांनाच कळून चुकले आहे. मोफत ऑक्सिजन देणारे शहरातील ठिकाण म्हणजे हिरवीगार उद्याने. मात्र कळंबोली मधील राखीव असलेल्या उद्यानात गेल्या अनेक महिन्यांपासून चक्क वाहने उभी केली जात आहेत. येथील शोभिवंत झाडे झुडपे पूर्ण नाहीशी झाली आहेत. याबाबत पनवेल महापालिकेच्या उद्यान अधिकाऱ्यांकडे वारंवार सांगूनही ते या उद्यानाच्या विकासासाठी लक्ष देत नाहीत. अखेरीस येथील नागरिकांनी संताप व्यक्त करून एक तर उद्यान विकसित करा अन्यथा उद्यानाचे कायमचे वाहन तळ तरी करा अशी मागणी कळंबोलीतील नागरिकांनी केली आहे.

वसाहतीमधील सेक्टर ४ मध्ये उद्यानासाठी राखीव भूखंड असून त्यावर लाखो रुपये खर्च करून उद्यान करण्यात आले होते. या उद्यानामध्ये जॉगिंग ट्रॅक, संरक्षक भिंत, त्याला लोखंडी दरवाजा, आबालवृद्धांना बसायला जागा बसायला तसेच शोभिवंत झाडे ही लावण्यात आली होती. मात्र चोरट्यांनी संरक्षक भिंत तोडून लोखंडी दरवाजाही चोरून नेला आहे. या उद्यानात बिनदिक्कतपणे मंडप टाकून सार्वजनिक कार्यक्रम ..../२

तळा बाजारपेठेतील रस्ता हरवला खड्ड्यात

पहिल्याच पावसात सर्वत्र चिखलाचे साम्राज्य

दै.रायगड नगरी । तळा

पावसाळा सुरू होताच तळा बाजारपेठेत सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरल्याचे चित्र पहायला मिळाले. बाजारातील रस्त्यांवर पडलेल्या मोठं मोठ्या खड्यांमुळे जणू रस्ता खड्ड्यात हरवला असून रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता आहे हेच येथील नागरिकांना कळेनासे झाले आहे.

तळा बाजारपेठेतील बळीचा नाका कडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठं मोठे खड्डे पडले असून या खड्ड्यांमधून वाहन चालवताना वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या खड्ड्यांचा आकार एवढा मोठा आहे की नागरिकांना या रस्त्यावरून चालताना देखील कठीण होऊन जाते. तसेच रस्त्याच्या मधोमध असलेल्या खड्ड्यामुळे बहुतांश वेळा अपघात घडता घडता राहिले आहेत. या रस्त्याचे काम एवढ्या

निकृष्ट दर्जाचे झाले आहे की दरवर्षी पावसाच्या सुरुवातीस बाजारपेठेत याच ठिकाणी खड्डा पडतो व तरीही नगरपंचायत प्रशासनाकडून त्याची कोणतीही दखल घेतली जात नाही. सोनार आळीत जाणारा यावर देखील खड्डे पडले असून पाणी तुबंत आहे. ठेकेदाराकडून तात्पुरती स्वरूपाची रस्त्याची ..../२

महिला व बालकल्याण समितीच्यावतीने शिष्यवृत्तीचे वाटप

दै.रायगड नगरी । पनवेल

महिला व बालकल्याण समितीच्यावतीने आज (मंगळवार दि.८ जून) एम.बी.बी.एस, बीडीएस, बी.ए.एम.एस, बी.एच.एम.एस विद्यार्थींनीना तसेच महापालिका क्षेत्रातील राज्य व राष्ट्रीय क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या महिला खेळाडूंना प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत वैद्यकिय शिक्षण (एम.बी.बी.एस, बीडीएस, बी.ए.एम.एस बी.एच.एम.एस) घेणाऱ्या मुलींना प्रोत्सहनात्मक शिष्यवृत्ती देण्याचा ठराव तसेच महापालिका क्षेत्रातील राज्य व राष्ट्रीय क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या महिला खेळाडूसाठी प्रोत्सहनात्मक शिष्यवृत्ती देण्याचा ठराव १८ डिसेंबर २०२० मध्ये संमत करण्यात आला होता. यानूसार वैद्यकिय क्षेत्रातील बारा विद्यार्थ्यांनीना

शैक्षणिक पात्रतेनूसार आणि क्रिडा क्षेत्रातील पाच विद्यार्थ्यानींना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

यामध्ये एम.बी.बी.एस. करणाऱ्या दिक्षा बोबडे, श्रीया मोरे, मधु शारबिंद्रे, तपस्या पाटील या विद्यार्थीनींना प्रत्येकी १ लाख रूपये, .../२

प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९

लाखाची लाजिरवाणी गोष्ट

करोनाच्या साथीने महाराष्ट्रातील एक लाखावा बळी गेला आहे. मृतांचा हा आकडा अंगावर काटा आणणारा आहे. महाराष्ट्राने दुसरी लाट थोपविण्यात यश मिळविले आहे, असे कोणीही कितीही परस्परांच्या पाठी थोपटून सांगितले, तरी हे मृत्यूचे तांडव भयानक आहे. महाराष्ट्र या भूप्रदेशाचा स्वतंत्र विचार केला, तर करोनाचे महाराष्ट्रापेक्षा जास्त बळी गेलेले जगाच्या पाठीवर केवळ नऊ देश आहेत. अमेरिका, ब्राझील, फ्रान्स, टर्की, ब्रिटन, रशिया, इटली, मेक्सिको आणि पेरू हे ते नऊ देश. सगळाच खोटारडेपणा करणारा चीनही यात घालता येईल. लोकसंख्येत महाराष्ट्र जगात सोळावा आहे. म्हणजे, निदान करोना बळीत तरी हा क्रमांक राज्याने टिकवायला हवा होता. तसे झालेले नाही. हे फार मोठे अपयश आहे आणि ही हीरक महोत्सव साजरा करणाऱ्या राज्याच्या दृष्टीने अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. तशी जाणीव ना राज्यकर्त्यांमध्ये दिसते; ना त्यांना विरोध करणाऱ्यांमध्ये. नोकरशाहीला तर काय वारा येईल तशी पाठ फिरवायची सवय झाली आहे; त्यामुळे अशा प्रसंगात उभे राहण्यासाठी त्यांच्या पाठीला कणाच शिल्लक नाही. गेले दीड वर्षे सगळा करोनाचा कहर महाराष्ट्राने येईल तो दिवस कसा तरी पुढे ढकलायचा, असाच काढला आहे. रुग्णालयांमध्ये लागलेल्या आगी, प्राणवायूसाठी झालेली धावपळ, विशिष्ट औषधांचा जीवघेणा काळा बाजार, रुग्णांच्या नातलगांची अनेक ठिकाणी झालेली पिळवणूक हे सगळे राज्याची आरोग्यच काय, सगळीच यंत्रणा कशी कोलमडून पडली होती, हे दाखविणारे होते. देशातील मृतांची संख्या तीन लाखांच्या वर आणि त्यातली ३३ टक्के एकट्या महाराष्ट्रात, ही आकडेवारी राज्य; तसेच केंद्र सरकारचे अपयश दाखविणारी आहे. अर्थात महाराष्ट्राने करोनाविषयीची आकडेवारी कधीच लपविली नाही; परंतु महाराष्ट्राने जर करोनावर नियंत्रण आणण्यात यश मिळविले असते, तर आज देशाची करोनास्थितीही अधिक बरी असती. याचे भान केंद्र सरकारनेही ठेवले नाही. तसे असते, तर दर चार दिवसांनी राज्य सरकार केंद्र सरकारबद्दल काही ना काही तक्रारी करते आहे, असे चित्र सातत्याने दिसले नसते. या तक्रारी खोट्या असतील आणि यात राजकारण असेल, तर महाराष्ट्रातले बळी वाचविण्यासाठी केंद्र सरकारने जालीम उपाय योजायला हवे होते. तसे ते केले नाहीत. केवळ राज्यकर्त्या तीन पक्षांचे नेते आणि विरोधी भाजपचे नेते परस्परांवर दुगाण्या झाडत आहेत, असे विमनस्क करणारे चित्र महाराष्ट्राची जनता पहिल्या व दुसऱ्या लाटेत पाहात होती आणि जिवलगांना निरोप देत होती. देशात काय झाले आणि इतर राज्यांनी काय केले किंवा केले नाही या चर्चेत न जाता, देशाला सर्वाधिक महसूल देणाऱ्या, सर्वाधिक प्रगत, आर्थिक राजधानी असणाऱ्या आणि आधुनिकतेच्या गप्पा मारणाऱ्या महाराष्ट्रात करोना इतका जीवघेणा का ठरला, याचे उत्तर शोधावेच लागेल. देशात दरवर्षी अर्धा लाख डॉक्टर तयार होत असावेत. यातले सर्वाधिक महाराष्ट्रात होतात. देशातील नोंदणीकृत डॉक्टरांची संख्याही महाराष्ट्रात सर्वाधिक, म्हणजे दीड लाखाच्या जवळ जाणारी आहे. दुसऱ्या क्रमांकावर तमिळनाडू आहे. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक वैद्यकीय प्रयोगशीलता दिसते. त्यात विदर्भातल्या बंग दाम्पत्यापासून कोकणातल्या डॉ. हिंमतराव बावस्करांपर्यंत असंख्य गुणिजन आहेत. त्रिस्तरीय आरोग्य यंत्रणेत महाराष्ट्र कसा इतरांच्या पुढे आहे, याची सतत टिमकी वाजवली जाते. मग महाराष्ट्राचे असे मृत्युराष्ट्र का झाले, या प्रश्नाच्या खोलात न जाणे, म्हणजे राज्याशी, येथील जनतेशी आणि मरण पावलेल्या लाखभर नागरिकांच्या स्मृतींशी द्रोह करणे आहे आणि हे खोलात जाण्याचे काम मुख्यत: राज्य सरकारचे आहे. राज्यात 'जागतिक आरोग्य संघटने'चे जे कोणी सल्लागार असतील ते असोत! पण आता करोनाचा विनाशकारी धडा लक्षात ठेवून महाराष्ट्राची आरोग्य व्यवस्था कशी हवी, याचा पुढील पन्नास वर्षांचा आराखडा तयार करण्यासाठी राज्य सरकारने त्वरेने उच्चाधिकार आयोग नेमावा. सगळी प्राथमिक आरोग्य केंद्रेही जरी उत्तम काम करत असती, तरी करोना बळींनी हा आकडा गाठला नसता. बहुतेक तालुका व ग्रामीण रुग्णालयांची अवस्था भयंकर आहे. यंत्रे आहेत तर तंत्रज्ञ नाहीत; सेवक आहेत तर डॉक्टर नाहीत, अशी स्थिती आहे. जगात ज्यांचे नावे आदराने घेतले जाते, असे अनेक धन्वंतरी महाराष्ट्रात आहेत. त्यांचा आणि वैद्यकीय व्यवस्थापनाचा उत्तम अनुभव असणाऱ्या तज्ज्ञांचा उपयोग करून या उच्चाधिकार आयोगाने सरकारला तपशीलवार अहवाल द्यावा. अर्थात, सर्वपक्षीय राज्यकर्ते व नोकरशहांचे खरे कौशल्य असे अहवाल मातीमोल करण्यात असते; मात्र या एक लाख करोना बळींची नैतिक जबाबदारी कोणाची, हा प्रश्न आहेच. या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर शोधले, तरच महाराष्ट्राला पुढे जाता येईल. नाही तर, 'महाराष्ट्र मेला; तरी राष्ट्र मेले' हे सेनापती बापटांचे काव्य विपरीत अर्थाने खरे होत राहील.

पेशव्यांचे पराक्रमी सरदार बाजी गोविंद जोशी यांची जांभुळपाडा येथील समाधी व दुर्लक्षित इतिहास उजेडात

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

सरसगडचे वैभव असलेले, थोरल्या बाजीराव पेशवे यांना सिद्धीवरील मोहिमेत साथ केलेले, या मोहिमेत यथ मिळाल्यानंतर सुधागड तालुक्यातील आसरे येथील विरेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार करणारे, पेशव्यांना कायम कर्नाटकावरील मोहिमेत सहकार्य करणारे, 'हवालदार जोशी' घराण्यातील पराक्रमी पुरूष सरदार बाजी गोविंद जोशी यांची जांभूळपाडा येथील समाधी पाच वर्षाच्या चिकाटीने व अथक परिश्रमाने ऐतिहासिक साधनाच्या व दस्ताऐवजाच्या अभ्यासातून शोधून काढण्यात पडघवली येथील इतिहास अभ्यासक व संशोधक संदिप मुकुंद परब यांना यश मिळाले आहे. त्याबद्दलचे अधिकृत पुरावे सादर करून जांभुळपाडा गावातील अंबा नदीकिनारी असलेली समाधी सरदार बाजी गोविंद जोशी याचीच असल्याचे देखील परब यांनी सिद्ध केले आहे.

संशोधक संदिप मुकुंद परब यांनी लिहिलेला 'मौजे जांभूळपाडा येथील सरदार बाजी गोविंद जोशी यांची समाधी–एक अभ्यास' हा शोध निबंध कोकण इतिहास पत्रिकेच्या एप्रिल २०२१ ते जून २०२१ या अंकात प्रसिद्ध करून इतिहास प्रेमी अभ्यासकाच्या समोर ठेवला आहे. सरदार बाजी गोविंद जोशी यांच्या ऐतिहासिक कारकिर्दी संदर्भातील माहिती माधवराव पेशव्यांच्या कर्नाटकातील स्वाऱ्या, पेशवे दफ्तर खंड–३७, सवाई माधवराव यांची रोजनिशी खंड–१ व ३, चित्तपावन (शांडिल्य) जोशी कुलवृत्तान्त तसेच चित्पावन या ऐतिहासिक साधनातून मिळाल्या संदर्भातील सविस्तर माहिती संदिप परब यांनी दिली.

जांभूळपाडा येथील समाधीचा कालखंड पाहिला असता सरदार बाजी गोविंद जोशी यांच्या कारकिर्दीशी जुळत असून पेशवाईत जांभूळपाडा येथे वास्तव्यास असलेल्या घराण्यापैकी जोशी यांचेच घराणे पेशवाईत मोठ्या हुद्दयावर कार्यरत होते. सरदार बाजी गोविंद जोशी यांना मिळालेली इनाम जमीन, त्यांच्या वंशजांचे जांभूळपाडा येथील वास्तव्य, पेशवाईतील त्यांच्या कार्यरत असण्या–संदर्भातील ऐतिहासिक साधनातील नोंदी व महेश तेंडुलकर यांच्या बंच ट्रेकिंग–३, सुरगड–सरसगड–सुधागड–ठाणाळे लेणी या ग्रंथात उल्लेखिलेल्या सरदार बाजी गोविंद जोशी व सुधागड तालुक्यातील सरसगड किल्ल्याशी निगडीत असलेल्या नोंदी या सर्वांचा विचार करता उपरोक्त समाधी ही त्यांचीच असल्याचे संदिप परब यांनी सिद्ध केले आहे.

जांभूळपाडा येथे अंबा नदी किनारी सरदार बाजी गोविंद जोशी यांची समाधी सुस्थितीत आहे. सदर समाधीवरील गोलाकार भाग हा मुळात छत्रीचा प्रकार असून त्यावर मोगल व राजस्थानी स्थापत्याचा प्रभाव असल्याचे स्पष्ट होते. ही समाधीही सन १७०० ते १८०० मधील समाध्याचा कालखंड दर्शविते. अशा प्रकारच्या समाध्या ह्या कोकण किनारपट्टी लगत मोठ्या प्रमाणात आढळत असून सदर समाध्याची पद्धत ही कोकणात आंग्रे काळाच्या उदयानंतर प्रसारित झाली. अशा प्रकारच्या बऱ्याच समाध्या सुधागड, रसाळगड या किल्ल्यावरती सापडतात. असे संदिप परब यांनी सांगितले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ग्रंथालय व व्याख्यान कक्ष, परिचारीका निवासस्थान आदी कामांच्या नुतनीकरणास प्रशासकीय मान्यता

दै.रायगड नगरी । अलिबाग

रायगड जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आगामी काळात सुरू करण्याच्या हेतूने पालकमंत्री कु.आदिती तटकरे या वैद्यकीय महाविद्यालयासाठी विविध कामांसाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. त्यामुळे लवकरच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग संस्थेसाठी हस्तांतरीत केलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत जिल्हा रुग्णालयाच्या आ–वारात वैद्यकीय महाविद्यालयासाठी ग्रंथालय व व्याख्यान कक्ष तसेच जिल्हा रुग्णालयातील परिचारीका निवासस्थानाच्या नूतनीकरणाच्या कामांना लवकरच सुरुवात होणार आहे.

याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत प्रशासकीय मान्यतेबाबत शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला आहे. यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे मध्यवर्ती ग्रंथालय व व्याख्यान कक्षासाठी ११ कोटी ८३ लक्ष ७५ हजार ५५५ रुपये व २४ नर्सिंग निवासस्थानांच्या विशेष दुरूस्ती व नूतनीकरणासाठी ३ कोटी ६२ लाख ५७ हजार ६२६ रुपये अशी एकूण १५.४६ कोटींची विकासकामे या माध्यमातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी करण्यात येणार आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेचे निकष पूर्ण करण्यासाठी ही नूतनीकरणाची कामे करणे आवश्यक आहे. या प्रशासकीय मान्यतेद्वारे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठीची महत्त्वाची विकासकामे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पूर्ण होत आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

पेण शहरातील धोकादायक इमारती सिल ; पेण नगरपरिषदेची कारवाई

इमारतींना सील ठोकण्यात आले आहे. तसेच मोतीराम तळे येथील धोकादायक वस्तीत राहणाऱ्या माथाडी कामगारांच्या २२ कुटुंबांना गुरुकुल शाळेत स्थलांतरित करण्यात आले आहे. या स्थलांतरित कुटुंबीयांची दोन वेळच्या जेवणाची सोय नगर परिषदेतर्फे करण्यात आली आहे.

या धडक कारवाईमध्ये मुख्याधिकारी अर्चना दिवे, कार्यालय अधीक्षक राजाराम नरुटे, पालिकेचे अभियंता विनायक बनसोडे, शिवाजी चव्हाण, शेखर अभंग, रमेश देशमुख, महेश वडके, किरण शहा, प्रवीण बैकर, कमलाकर आवास्कर आदींसह नगरपालिकेच्या कर्मचार्यांनी सहभाग घेतला होता.

लोहारमाळ नजिकच्या मोरीवरून कार नाल्यात पडली

मोरीच्या बांधकाम परिस्थितीचा अंदाज न आल्याने अपूर्ण असलेल्या दोन मोऱ्यांच्या मधल्या भागात कोसळली. यावेळी पाऊस असल्याने कारच्या खिडक्या बंद होत्या. यामुळे कारमधील प्रवासी व चालकांना अपूर्ण कामातील लोखंडी गजांपासून कोणतीही दुखापत अथवा जखमा झाल्या नाहीत आणि ते बालंबाल बचावले. कारच्या दरवाजांची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे.

पोलादपूर पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा करून अपघातग्रस्त वाहन नाल्यातून बाहेर काढण्यासाठी एलॲण्डटी ठेकेदार कंपनीच्या क्रेनचा वापर केला तसेच खासगी क्रेनने वाहन दुरूस्तीसाठी रवाना केले.

कळंबोलीतील उद्यानाचे वाहनतळ करण्याची मागणी ; उद्यान अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

केले जातात. त्यामुळे येथे लावलेली झाडे ही मरणासन्न अवस्थेत राहतात. आता तर महापालिकेच्यावतीने नागरिकांची मागणी नसतानाही उद्यानांमध्ये संडास आणि बाथरूमची सोय करण्यात आली आहे. तसेच उद्यानाला दरवाज्या नसल्याने येथील नागरिक या उद्यानाचा वाहनतळ म्हणून उपयोग करीत आहेत. उद्यानाच्या आजूबाजू चार सोसायटी मधील काही नागरिक या उद्यानात दरवर्षी शोभिवंत झाडांची लागवड करतात. मात्र सिडको अथवा महापालिकेचे दुर्लक्ष झाल्याने या उद्यानाला कोणी वालीच नसल्याचे दिसून येत आहे. लावलेली झाडे मुले क्रिकेट खेळून तोडून टाकतात तर आबाल वृद्धांसाठी असलेल्या जागेवर रात्री मद्यपी आपला ग्लास भरून बसलेले दिसतात. तसेच काचेच्या बाटल्या फोडून नागरिकांची कुचंबना करतात. त्यामुळे या उद्यानावर सिडको व महापालिका कशासाठी लाखो खर्च करीत आहे असा सवाल उपस्थित केला जात आहे. गेल्या अनेक महिन्यापासून या उद्यानात अनेक वाहने सर्रास उभी केली जातात. भंगार अवस्थेमध्ये ही वाहने याठिकाणी ठेवण्यात आली आहेत. मात्र महापालिकेच्या अतिक्रमण विभाग याकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे येथील नागरिक संतापले असून एक तर सदरचे उद्यान विकसित करावे व नागरिकांसाठी सुरक्षित ठेवावे. अन्यथा या उद्यानाचे कायमचेच वाहनतळ करून तशी व्यवस्था करावी अशी उपरोधिक मागणी नागरिकांकडून केली जात आहे. याबाबत पनवेल महापालिकेतील उद्यान अधिकारी राजेश कर्डिले यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की उद्यानांचे देखभाल खर्च व्यवस्थापनाचे काम सुरू आहे. संबंधित प्रस्ताव विविध विभागांना गेलेले आहेत. त्यासंबंधी लवकरच कामे केली जातील. परंतु जर उद्यानांमध्ये वाहने उभी केली असतील तर ती लवकरच काढून उद्यानाला संरक्षक भिंत व दरवाजा लावून देण्याचे काम त्वरित पाहणी करून केले जाईल.

तळा बाजारपेठेतील रस्ता हरवला खड्ड्यात

डागडुजी केली जाते. परंतु काही दिवसांचा काळ लोटताच रस्त्याची अवस्था पुन्हा जैसे थे होऊन जाते. एवढे असूनही नगरपंचायत प्रशासन ठेकेदाराला पाठीशी घालत याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांमधून करण्यात येत आहे. पाऊस पडल्यानंतर पाणी खड्डयात साठून वाहनांमुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांच्या अंगावर हे चिखलाचे पाणी उडते. यामुळे कपडे खराब होत असल्याने नागरिकांना मनःस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने याकडे लक्ष देऊन संबंधित ठेकेदाराला रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजविण्याचे आदेश द्यावे तसेच ठेकेदाराने पुन्हा काम निकृष्ट दर्जाचे केल्यास त्याच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी तळा वासीयांकडून करण्यात येत आहे.

महिला व बालकल्याण समितीच्यावतीने शिष्यवृत्तीचे वाटप

बी.एच.एम.एस. करणाऱ्या शिवानी वनवे, सना खान, नम्रता शेळके, नेहा पाटील, रिया, पाटील, भारती पवार यांना प्रत्येकी ५० हजार रूपये, बी.ए.एम.एस करणाऱ्या सीमा कुत्तरवडे हिस ५० हजार रूपये, बी.डी.एस करणाऱ्या अपेक्षा पाषाणकर हिस ५० हजार रूपये शिष्यवृत्ती देण्यात आली.

तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील राज्य व राष्ट्रीय क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या स्नेहल माळी (राष्ट्रीय स्तर, सायकलिंग)हिस २५ हजार रूपये, रूजूता बुकम (राज्य स्तर, एअरगन शुटिंग) हिस १० हजार, कोमल खांडेकर(राज्य स्तर, तिहेरी उडी) हिस १० हजार, आकांक्षा निटुरे(आंतरराष्ट्रीय, टेनीस) हिस २५ हजार रूपये, मोनिका चिकणे(राज्य् स्तर, ओशो, बॉक्सींग) १० हजार रूपये शिष्यवृत्ती देण्यात आली.

यावेळी महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, महिला बालकल्याण समितीच्या सभापती मोनिका महानवर, प्रभाग समिती 'ड' सभापती सुशीला घरत, नगरसेविका प्रीती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, रूचिता लोंढे, राजश्री वावेकर, पुष्पा कुत्तरवडे, अरुणा दाभणे, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे उपस्थित होते. कोविडच्या सर्व नियमांचे पालन करून सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

माणगावात रानभाज्यांची आवक वाढली या रानभाज्यांना शहरात मागणी फार

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

माणगांव तालुक्यात रानभाज्यांची आवक वाढली शहरात आणि हायवेवरील पर्यटक भाजी घेण्यासाठी आतुर झाले आहेत. या रानभाज्या मध्ये करटोली, शेवलं, अकुर, भारंग, कुलु (कुवाळा), रानटी टेरी, गरगटी, आळू, म्हशेळीपान, कुर्डु, कुड्याची शेंग–फुल, शेवग्याची पान–फुल, टाकळा, इत्यादी प्रकार सापडतात. भवरीची पान, याच्या बेसन लावुन वड्या करतात. आता हा भाजीचा प्रकार फक्त ऐकण्यापूर्ता शिल्लक राहिला असल्याचे खेड्यातील जाणकार सांगतात. मुंबई गोवा महा–मार्गालगत आदिवासी महिला मोठय़ा प्रमाणावर रानभाज्या विकायला बसलेल्या दिसतात.

स्थानिक लोकांसह प्रवासी पर्यटक त्या घेण्यासाठी हायवेवर गर्दी करतात. या भाज्या पावसाळ्यात मिळत असल्याने त्यांना चांगली मागणी असते. पूर्वी माण–गाव तालुक्यात दारोदार घ्या गों भाजी... असा आवाज देऊन आदिवासी विकत असताना दिसत असत. पण अलिकडे हायवेवरच आदिवासी महिला रानभाज्या विक्री साठी बसलेल्या आढळतात. बरं या भाज्यांचे दर ही जास्त सांगत आहेत. पावसाळ्यात हे आदिवासी याच व्यवसायातून चार पैसे कमविता. आपला चरितार्थ ही लोक चालवितात.

या भाज्या शिजविताना एका विशिष्ट पद्धतीतच त्या बनव्यावा लागतात. यात शेवलाची भाजी बनविताना भोंडग्याचा पाला वापरतात. आणखी एका प्रकारचा पाला वापरला जातो, त्याला नान्याचा पाला असे खेड्यात संबोधतात. हा पाला सुकवतात आणि जसा लागेल तसा वापरतात. मुंबईकर गावाकडे आले कि हा पाला घेऊन जातात. यातील प्रत्येक भाजीचे अनेक औषधी उपयोग गावाकडे सांगितले जातात. या भाज्यांची उप–लब्धता ही केवळ पावसाळ्यातच असते. त्यामुळे इतर वेळी या भाज्यांचे पिकं घेता येत नाही.

कुलु, कुवाळा हे एक प्रकारचे कोवळे गवतच असते. याची चव कांद्याचे पाती सारखीच आहे. या भाज्या नुसत्या कांदा, लसुणीवर बनविण्यात येतात. चवी साठी यात डाळी, बीरड देखील टाकतात. आणि फारच थोडे तेल, मीठ वापरावे लागते. अतिशय पौष्टिक, चवदार आणि पचायला हलक्या असतात. भारंग भाजी खाण्या मुळे पोटाचे, पचनसंस्थेचे अनेक विकार बरे होतात. अस अनेकजण ठामपणे सांगतात. अस म्हणतात पावसाळ्यात एकदातरी या भाज्या खाव्यातच. अशा या नैसर्गिक उपयुक्त रानभाज्या होत.

ग्रामपंचायत विचुंबे

ता.पनवेल, जि.रायगड

जाहीर निविदा

विचुंबे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व अनुभवी ठेकेदार यांस,

आपणास कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे सिलबंद निविदा मागविण्यात ये त आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांनी दि.१५/०६/२०२१ रोजी निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास दुपारी २.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे, कोणतेही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणारे सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	इसारा रक्कम १%	सुरक्षा अनामत रक्कम ५%	ठेकेदाराचा वर्ग	निविदा किंमत	निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख	काम पूर्ण करणेचा कालावधी
१	कृष्ण वंदना सोसायटी ते ओमकार कृष्णा रो हाऊस पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे	६९०७२६/–	६९०७.२६	३४५३६/–	क	१००	१५/०६/२०२१	३ महिने
२	नामदेव म्हात्रे घर ते सागर म्हात्रे यांचे घरापर्यंत आर.सी.सी.पाईप गटार बांधणे	७२६६०२/–	७२६६/–	३६३३०/–	क	१००	१५/०६/२०२१	३ महिने

अटी व शर्ती :

१) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

२) ग्रामपंचायतीकडे विनंती केल्यास रु.१००/– भरणा केल्यास अंदाजपत्रकाची प्रत देण्यात येईल.

३) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

४) निविदा किंमत ना–परतावा समजावी.

५) मुल्यांकनप्रमाणे अदा करावयाच्या रकमेतून नियमाप्रमाणे १२% जी.एस.टी., १% सेस, १% आयकर, १% मजुरविमा, १% इसारा, ५% दराने सुरक्षा अनामत रक्कम पात करण्यात येईल.

६) अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.

७) निविदा मंजूर केल्यास रु.१००/– चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून द्यावा लागेल.

८) ५% सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल व सदरची सुरक्षा अनामत कामाची गुणवत्ता पाहून ६ महिन्यानंतर अदा करण्यात येईल.

९) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.

१०) झालेल्या तांत्रिक मुल्यांकनाप्रमाणे व रकमेच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.

११) निविदा मंजूर केल्यास दोन दिवसांत काम सुरू करणे बंधनकारक राहील.

१२) ग्रामपंचायतीकडे उपलब्ध होणाऱ्या अनुदानानुसार सदर बिलाची रक्कम अदा करण्यात येईल.

दिनांक : ०९/०६/२०२१

सही/–
श्री.जे.पी.चवरकर
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत विचुंबे
ता.पनवेल, जि.रायगड

सही/–
सौ.नम्रता आकाश पाटील
सरपंच
ग्रामपंचायत विचुंबे
ता.पनवेल, जि.रायगड

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

तीन बांगलादेशीयांवर पनवेल तालुका पोलिसांनी केली कारवाई

दै.रायगड नगरी । पनवेल

अवैध मार्गाने वैध प्रवासी कागदपत्राशिवाय भारत बांगलादेश सीमेवर भारतीय हद्दीत घुसखोरी करून भारतात प्रवेश करून पनवेल तालुका परिसरात राहणाऱ्या तीघा बांगलादेशीयांविरोधात पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे.

तालुक्यातील नेरे पाडा येथील एका चाळीमध्ये श्रीमती. लाखी गुलाम मलिक (४५), मासुद राणा इंदुशेख (२७) व श्रीमती.जमूना मासुद राणा (२१) हे बेकायदेशीररित्या या ठिकाणी राहत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील कारोटे व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून या तिघांविरुद्ध पारपत्र (भारतात प्रवेश) नियम १९५० चे कलम ३ (अ), सहा.(अ) सह विदेशी नागरिकांचा कायदा १९४६ चे कलम १४ (ए) प्रमाणे कारवाई केली आहे.

पेट्रोल दर १०० रुपयाच्या वर, सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

दिवसेंदिवस पेट्रोल दरात प्रचंड मोठ्या वाढ होत असून त्याचे दर शंभर रुपयाच्या वर १०१.७४ रुपया वर गेला असुन ते दर अधिक वाढले जाण्याची दाट शक्यता असल्याने सर्वसामान्य जनतेला टुव्हीलर गाडी चालवणे न परवडणारे असल्यामुळे पुन्हा एकदा सायकल चालवणे अधिक सोविस्कर होईल यामुळे सायकल व्यवसायाला परत सुगीचे दिवस येतील.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दोन वर्षांपासुन सर्वत्र लॉक डाऊन करण्यात आला.यामुळे अनेक व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे.तर अनेकांना आपल्या नोकऱ्या गमवाया लागल्या आहेत.अशातच महागाईने कळस गाढला आहे. तर पेट्रोलचे दर १०० रुपयांच्यावर गेल्याने दिवसभर काम करुन तीनशे रुपये कमवणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना टुव्हीलर गाडी सर्व्हिसिंग व पेट्रोल हे न परवडणारे आहे यामुळे गड्या आपली सायकल बरा!अशी बोलण्याची वेळ आली आहे. याशिवाय दिवसेंदिवस अनेक रोगांचे प्रमाण ही वाढत असल्याचे दिसुन येत आहे.यावर कोरोना विषाणूवर मात करण्यासाठी शरीर ही सुदृढ असणे गरजेचे आहे.यामुळे सायकल चालवून आपल्या शरीराच्या हालचालीमुळे शरीर सदृढ व निरोगी होऊ शकतो व तुम्ही कोणत्याही आजरावर मात करु शकता असे मत जाणकारांकडून व्यक्त केले जात असुन लोकांनी सायकल चालवणे गरजेचे आहेत. तर सर्वसामान्य जनतेचे पेट्रोलचे लागणारे पैशांची ही बचत होईल यामुळे सायकल व्यवसायाला ही सुगीचे दिवस येतील.

माथेरान १५ जुननंतर अनलॉक होणार? जिल्हाधिकाऱ्यांचे संकेत

दै.रायगड नगरी । माथेरान

केवळ पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या माथेरान मधील नागरिकांना लॉक डाऊन काळात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. विविध भागातून जीवनावश्यक वस्तूंच्या वाटपासाठी मदतीचा हातभार लागत असल्याने उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागत आहे परंतु अन्य महत्वाच्या बाबींसाठी आर्थिक चणचण मोठया प्रमाणावर जाणवत आहे यासाठी माथेरान लवकरात लवकर अनलॉक करण्यात यावे यासाठी विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांनी सातत्याने जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे पाठपुरावा केला होता.मेलद्वारे सुध्दा निवेदन

सादर केले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांना चर्चे साठी बोलावले होते.त्यामुळे आज दि.८ रोजी प्रत्यक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांची भेट घेऊन माथेरान अनलॉक करावे याबाबत सविस्तरपणे चर्चा करण्यात आली आहे.

माथेरान मध्ये कोरोना रुग्णांची संख्या नगण्य असून ४५ वर्षावरील नागरिकांचे कोव्हीड लसीकरणचे एकएक डोस जवळजवळ पूर्ण झाले आहे.त्यामुळे इथे जास्त प्रमाणात कोरोना रुग्ण आढळून येत नाहीत.नागरिक आपली स्वतःची आणि इतरांची सुध्दा जबाबदारी घेत आहेत. पोलीस प्रशासन सुध्दाआपले कर्तव्य चोखपणे बजावत आहेत.

नगरपरिषदेच्या दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी वर्ग दिवसरात्र मेहनत घेत आहेत त्यामुळे गावातील नागरिक कोरोना पासून सुरक्षित आहेत.१४ एप्रिल पासून लॉक डाऊन जाहीर झाल्यामुळे दोन महिण्यांचा कालावधी होत आल्याने इथे पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या सर्व नागरिकांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे त्यासाठी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि नगरपरिषद सभागृह गटनेते प्रसाद सावंत यांनी रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांची भेट घेऊन इथली एकंदरीत भौगोलिक परिस्थिती समजावून सांगितली आहे त्यानुसार माथेरान १५ जुननंतर अनलॉक होईल? असे जिल्हाधिकाऱ्यांनी संकेत दिले आहेत त्यामुळे नागरिकांमध्ये समाधान दिसून येत आहे.

धुतूम ग्रामपंचायतीमध्ये शुन्य घनकचरा प्रकल्प

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून धुतूम ग्रामपंयातीने पर्यावरणास पूरक अशा निसर्ग ऋण शून्य घनकचरा (झिरो गार्बेज) व्यवस्थापन प्रकल्प सुरू केला आहे. आयोटीएल कंपनीच्या सीएसआर फंडातून या प्रकल्पासाठी रू २६ लाख ८५ हजार खर्च करून हा प्रकल्प सूरू करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे लोकार्पण रायगड जिल्हाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कोविड १९ मुळे उरण दौऱ्यावर असताना सदर प्रकल्पाला आज भेट देऊन नवीन प्रोजेक्टचे उद्घाटन केले.

या अगोदर ग्रामपंचायत धुतूम यांनी हा प्रकल्प पायाभूत सुविधा व ओल्या काचऱ्या पासून कंपोस्ट खत असा प्रोजेक्ट कार्यान्वित होता, याच्यात संपूर्ण कचऱ्याची विल्हेवाट लागत नसल्याने सरपंच सौ रेश्मा ठाकूर यांनी IOTL यांच्याकडे पाठ

पुरावा करून CSR च्या माध्यमातून हा संपूर्ण शून्य घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प साकारला आहे. कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर आणि उरण पंचायत समितीचे सदस्य दिपक ठाकूर, विशेष मान्यवर आयओटीएलचे व्हाइस प्रेसिडेंट अतुल खराटे, मिलिंद मोघे कन्सल्टंट (IR), भूपेश शर्मा टर्मिनल मॅनेजर, दुर्गा प्रसाद त्रिपाठी सेफ्टी हेड हे मुख्य अधिकारी कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी उरणचे गट विकास अधिकारी नीलम गाडे, रायगड जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, विस्तार अधिकारी अनिल नारंगीकर, सरपंच सौ.रेश्मा शरद ठाकूर, उपसरपंच सौ सविता रुपेश ठाकूर, माजी उपसरपंच सौ वैशाली किशोर पाटील, माजी उपसरपंच सौ आशा महिंद्र ठाकूर, माजी उपसरपंच सदानंद विट्ठल ठाकूर, तुकाराम ठाकूर, मेघनाथ ठाकूर, नंदेश ठाकूर, किशोर परब, पाटील डॉक्टर व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी पर्यावरण दिना निमित मैदानाच्या सभोवताली वृक्षारोपण देखील केले. तसेच ग्रामपंचायतीने केलेले वृक्ष लागवड व जोपासना या बद्दल सरपंच व ग्रामपंचायत यांचे कौतुक केले.

बसच्या धडकेत रस्ता ओलांडणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू

दै.रायगड नगरी । पनवेल

रस्ता ओलांडणाऱ्या ६० वर्षीय व्यक्तीला खाजगी बसने धडक दिल्याने झालेल्या अपघातात सदर व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-पनवेल मार्गावर खांदा कॉलनी येथे घडली. या अपघातानंतर बस चालक पळुन गेला असून खांदेश्वर पोलिसांनी सदर बस चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे नाव मारुती पांचाळ (६०) असे असून ते पनवेल मध्ये कुटुंबियांसह रहाण्यास होते. पांचाळ सुतारकाम करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. ते खांदा कॉलनी परिसरात काम करण्यासाठी आले होते. त्यानंतर रात्री ११ वाजण्याच्या सुमारास ते खांदा कॉलनी येथील तलावाजवळून मुबंई पनवेल मार्ग ओलांडून जात होते. याचवेळी मुंबईहुन पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या खाजगी बसने त्यांना धडक दिली. यात पांचाळ गंभीर जखमी होऊन मृत पावले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर खांदेश्वर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या बस चालकाविरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

श्रीवर्धन तालुक्यात २४ कोरोना पॉझिटीव्ह तर एकाचा मृत्यू

दै.रायगड नगरी । दिघी

श्रीवर्धन तालुक्यामध्ये मंगळवारी ८ जून रोजी मिळालेल्या कोरोना चाचणी अहवाल नुसार तालुक्यात २४ रुग्णांची वाढ झाली आहे. आज १६ रुग्णांनी कोरोनावर मात केली. तर एक रुग्णांचा मृत्यु झाला आहे.

यामध्ये श्रीवर्धन शहर १६, बोर्ली पंचतन १, दिवेआगर १, मेटकर्णी १, आराठी १, सर्वे १, सायगांव १, कोलमांडला १ तसेच पुनीर १ रुग्णांचा रिपोर्ट पॉजेटीव्ह आला आहे. तालुक्यातील ता. ८ जून रोजी मिळालेल्या कोरोना चाचणी अहवालानुसार २४ रुग्ण संख्या वाढली असून एक रुग्णाचा मृत्यु झाला आहे. आता बाधित रुग्णांची एकूण संख्या १०९० झाली आहे. यातील ५१ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह होऊन दगावले आहेत. तर ८६९ रुग्ण कोरोनावर मात करुन बरे झाले आहेत. सध्या १७० रुग्ण उपचार घेत आहेत.

लोकनेते साबळे जयंती दिनी प्रत्येकाने एक रोपटे लावा : ॲड.राजीव साबळे

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

लोकनेते माजी आमदार कै. अशोकदादा साबळे यांच्या ७६ व्या जयंती निमित्त माणगावकरांनी दि. ७ जुन रोजी कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करीत अशोकदादा साबळे विद्यालयात दादांच्या भव्य स्मृती स्मारका जवळील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले. यावेळी दादांचे सुपूत्र शिवसेना नेते ड. राजीव अशोक साबळे यांनी दादांच्या स्मृती निमीत्त आठवण म्हणुन प्रत्येक माणगांवकराने एक रोपटे नक्की लावा, झाडांमुळेच मिळणाऱ्या ऑक्सिजनची आज समाजाला खऱ्या अर्थाने गरज आहे. तिच खरी लोकनेते दादा साबळेंना आदरांजली ठरेल असे उपस्थितांना भावपूर्ण आवाहन केले. याप्रमाणे स्वतः राजीव साबळे व उपस्थित मान्यवरांचे हस्ते द.ग. तटकरे महाविद्यालयात वृक्षारोपण देखिल करण्यात आले.

याप्रसंगी सुभाष मेहता, ॲड. मानकर, कृष्णा गांधी, नरेंद्र गायकवाड, संजय अण्णा साबळे, रमेश वेदपाठक, नगरसेवक बाळूशेट बामुगडे, शहर प्रमुख अजित तार्लेकर, ज्योती बुटाला, ज्योती गायकवाड, मनिषा मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमा निमीत्त साबळे विद्यालयातील मोरेश्वर सभागृहात मान्यवर शिक्षिका सुनंदा पवार, शिल्पा भोनकर, मनिषा लाड-रणपिसे, कुंदा टेंबे, ज्युनियर कॉलेजचे प्रा. झेंडे, डिजीटी सिनियर कॉलेजचे प्राचार्य खामकर, नगरसेवक सचिन बोंबले, सुप्रसिध्द वकिल ॲड. विनोद घायाळ, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बाळा दळवी, उद्योजक रमेश जैन आदी माणगावकरांनी आपल्या मनोगतातून दादांच्या कार्यस्मृतींना उजाळा देत त्यांच्याबद्दल भावपूर्ण गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कला शिक्षक राजा पवार यांनी पार पाडले.

शर्मिला ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसेचा सामाजिक उपक्रम

दै.रायगड नगरी । कळंबोली

मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोलीतील मनसैनिकांनी एक चांगला सामाजिक उपक्रम राबवला. आज वसाहतीमधील अपंग बांधवांना वाफ घेण्याचे विजेवर चालणारे वाफारे भेट म्हणून दिले. यावेळी अपंग बांधवांनी मनसेच्या या उपक्रमाला शुभ आशीर्वाद देऊन धन्यवाद दिले.

मनसेच्या शर्मिला राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आज पनवेलमध्ये विविध ठिकाणी मनसैनिकांनी विविध कार्यक्रम व सामाजिक उपक्रम आयोजित केले होते. कळंबोली मधील मनसेचे राहुल चव्हाण. नितीन काळे, विवेक बोराडे व अन्य मनसैनिकांनी वसाहतीमधील अपंग बांधवांसाठी उपक्रम राबवून वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केला. वसाहतीमधील असलेल्या सर्व अपंग बांधवांना त्यांच्या घरी जाऊन कोरोना काळात अतिशय उपयुक्त ठरणारे वाफ घेण्याचे इलेक्ट्रिक वर चालणारे साधन भेट म्हणून दिले. यावेळी अपंग बांधवांनी मनसेच्या मनसैनिकांना आशीर्वाद देऊन धन्यवादही दिले. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. कोरोना काळात या अपंग बांधवांना ही कोणतेही काम मिळेनासे झाले आहे. त्यांचे असणारे स्टॉल ही या काळात बंद होते. त्यामुळे उत्पन्नाचे साधन हिरावून गेले होते. यावेळी त्यांची प्रकृती सुदृढ व निरोगी रहावी व कोरोनाशी मुकाबला करता यावा यासाठी वसाहतींमधील शहर प्रमुख राहुल चव्हाण यांच्या पुढाकाराने अपंग बांधवांना विजेवर चालणारे वाफारे भेटून शर्मिला राज ठाकरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केला.

चेन खेचून चोरटे पसार

दै.रायगड नगरी । पनवेल

धनराज मारुती माने सिडको मध्ये काम करतात. ते मॉर्निंग वॉकसाठी खारघर येथे गेले असता त्यांच्या पाठीमागून एक दुचाकी आली. त्यातील एकाने त्यांच्या गळ्यातील ७५ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन जबरीने खेचली व तो दुचाकी चालक पळून गेला.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे : नागझरी, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिल श्री.गुरबाखष कुमार बी.कांजवाणी, रा.साईप्रसाद को. ऑ.हौ.सो., सेक्टर १०, खारघर, नवी मुंबई-४१०२१० यांनी खालील जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : नागझरी, ता.पनवेल, जि.रायगड

गट क्रं. / उपविभाग	भुधारणा पद्धती	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु.पै.	जमीन मालकांचे नाव
१३/१/त	भो वर्ग १	०-४२-४० पैकी ०-०९-४०	१.८७ ०.४१	पैकी बिना सुर्यकांत माने सुर्यकांत विनायक माने यांचे अविभक्त हिश्श्यातील

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी सामंजस्य करार, विक्रीचा करार, मक्ता, रस्ता वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, ट्रस्ट, इजमेंट, बोजा, मृत्यूपत्र, दान, बक्षिस, अखत्यारपत्र, कुळहक्क इ.कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खालील सही करणार वकील यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने वा कुरियरने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याहीप्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०८/०६/२०२१

सही/-
ॲड.नरेश गणपत ठाकूर
साईप्रसाद निवास कोपरा खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०
मो.नं.९३२४०८०२५४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, १) श्री.शंकर विठ्ठल मुंगाजी २) श्री.धनराज विठ्ठल मुंगाजी दोघे रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड यांची मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नंबर ३/३+११/बी क्षेत्रफळ ०.३७.२ (हे.आर.पॉ.) ही जमीन मिळकत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामांसाठी संपादीत झाली असून त्याचा निवाडा प्रकरण क्रमांक ओवळे युनिट केस क्र.९६ ने जाहीर झालेला आहे.

सदरहू जमीन मिळकतीचे संपादनाचे नुकसान भरपाईपोटी ५९० चौ.मी. क्षेत्राचे विकसित भूखंड मिळणेस १) श्री.शंकर विठ्ठल मुंगाजी २) श्री.धनराज विठ्ठल मुंगाजी हे दोघे पात्र ठरलेले आहेत. त्या अनुषंगाने शहर व औद्योगिक विकस महामंडळ मर्यादित (सिडको) ने १) श्री.शंकर विठ्ठल मुंगाजी २) श्री.धनराज विठ्ठल मुंगाजी यांना भूखंडाचे वाटपपत्र क्र.सिडको/आंवित/२०१५/४३२/OWA-96 दिनांक ०३/०६/२०१५ ने भूखंडाचे वाटप केलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

नोड	भूखंड क्रमांक	सेक्टर क्रमांक	क्षेत्रफळ चौ.मी.
पुष्पक (दापोली), ता.पनवेल, जि.रायगड	४०५	३	५९०

माझे अशिल श्रीमती.निलम हरी गायकवाड रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड हे उपरोक्त नमूद भूखंड ५०-५० टक्के तत्वावर विकसित करण्यासाठी हस्तांतरीत करून घेण्याच्या विचारात आहेत.

तरी सदर जमीन मिळकतीचे अथवा सदर भूखंडाचे बाबतीत अथवा त्याच्या कोणत्याही हिश्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा, कोणत्याही प्रकारची बुकींग वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून माझे अशिल सदर भूखंड त्यातील हक्क हितसंबंधासहीत त्रिपक्षीय करारद्वारे हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : ओवळे, पनवेल
दि.०८/०६/२०२१

सही/-
ॲड.जितेंद्र परशुराम म्हात्रे
मु.ओवळे, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
advjitendramhatre@gmail.com

ग्रामपंचायत पालीदेवद

मु.पालीदेवद (सुकापूर), ता.पनवेल, जि.रायगड

जाहीर निविदा

पालीदेवद ग्रामपंचायत हद्दीतील खालील विकास कामे करण्याकरिता विहित मुदतीमध्ये नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद पाकीटात निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	इसारा रक्कम	निविदा फॉर्म मिळण्याची मुदत	निविदा फॉर्म स्वीकारण्याची अंतिम मुदत	शेरा
१	पालीदेवद ग्रामपचांयत हद्दीत स्ट्रिट लाईट हायमास्ट पोल बसविणे (नागरी सुविधा योजना)	९,९९,९९८/-	९९९९/-	दि.०९/०६/२०२१ ते १४/०६/२०२१	१६/०६/२०२१ दुपारी ३.०० वाजेपर्यंत	
२	प्रेरणा सोसायटी ते गणेश मंदिर पर्यंतचे गटार बांधकाम करणे	६,८९,८१५/-	६८९७/-	दि.०९/०६/२०२१ ते १४/०६/२०२१	१६/०६/२०२१ दुपारी ३.०० वाजेपर्यंत	
३	पालीदेवद ग्रामपंचायत हद्दीत स्ट्रीट लाईट हायमास्ट पोल बसविणे (नागरी सुविधा योजना)	१७,९९,९६६/-	१७९९९/-	दि.०९/०६/२०२१ ते १४/०६/२०२१	१६/०६/२०२१ दुपारी ३.०० वाजेपर्यंत	सदरील कामाची ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या mahatenders.gov.in ह्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.
४	साक्षी पार्क ते एक्सप्रेस हायवे पर्यंतचे गटार बांधकाम करणे	१०,४२,९१५/-	१०४२१/-	दि.०९/०६/२०२१ ते १४/०६/२०२१	१६/०६/२०२१ दुपारी ३.०० वाजेपर्यंत	सदरील कामाची ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या mahatenders.gov.in ह्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

१) वरील कामाच्या निविदा मोहोरबंद पाकीटात मा.सरपंच, ग्रामपंचायत पालीदेवद यांचे नावे दि.१६/०६/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.

३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

४) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दि.१६/०६/२०२१ रोजी सायंकाळी ठिक ०४.०० वाजता मा.सरपंच यांचे समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

५) कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारांस कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

६) सदर कामांचे अंदाजपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाण : पालीदेवद
दिनांक : ०९/०६/२०२१

सही/-
(नंदकिशोर कृष्णा भगत)
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत पालीदेवद

सही/-
(योगिता राजेश पाटील)
सरपंच
ग्रामपंचायत पालीदेवद

संक्षिप्त...

'शास्त्रशुद्ध-लयबद्ध सूर्यनमस्कार स्पर्धा २०२१' चे आयोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

जागतिक योग दिनानिमित्त कोशिश फाऊंडेशनच्या वतीने 'शास्त्रशुद्ध-लयबद्ध सूर्यनमस्कार स्पर्धा २०२१' चे आयोजन करण्यात आले आहे.

आठ गटांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेतील प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकास ५५५५ रुपये, द्वितीय क्रमांकास ३३३३ हजार रुपये, तृतीय क्रमांकास २२२२रुपये तसेच दोन उतेजनार्थ प्रत्येकी ११११ रुपये त्याचबरोबर सन्मानचिन्ह अशी एकूण विजेत्यांना ९८ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. हि स्पर्धा पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी मर्यादित असून स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकाने सूर्यनमस्काराचा व्हिडीओ रेकॉर्ड करून १५ जून पर्यंत pareshthakur.in या संकेत स्थळावर पाठवणे आवश्यक आहे. स्पर्धेतील विजयी स्पर्धकांची नावे २१ जूनला म्हणजेच जागतिक योग दिनी जाहीर करण्यात येणार आहे.या स्पर्धे चा जास्तीत जास्त योग प्रेमींनी लाभ घ्यावा, त्यासाठी अधिक माहितीसाठी ७७५७०००००० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

ओएनजीसी प्रकल्पात मोराचा वावर

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

ओएनजीसी प्रकल्पात मोर दिसून आल्याने कामगार वर्गाने समाधान व्यक्त केले आहे. राष्ट्रीय पक्षी असणाऱ्या मोर या पक्षाच ओएनजीसी प्रकल्पात प्रथमच दर्शन झाल्याने सदर मोरांचे जतन करण्यासाठी ओएनजीसी आणि वन विभागाने पुढाकार घ्यावा अशी मागणी कामगार वर्ग करीत आहेत.

पावसाची चाहूल लागताच उरण तालुक्यातील चिरनेर, चिर्ले, वेश्वी, कळंबुसरे, पुनाडे, जेएनपीटी, आवरे, केगाव या परिसरात मुक्त संचार करणाऱ्या मोरांचा वावर दिसून येत आहे. परंतु डोंगर परिसरातील वाढत्या उत्खननामुळे आणि शिकारी मुळे या परिसरातील मोरांची संख्या हळूहळू कमी होत आहे. त्यात नूकताच ओएनजीसी प्रकल्पातील कामगारांना ओएनजीसी प्रकल्पातील झाडा झुडपांतील संरक्षण जाळीवर मोर या राष्ट्रीय पक्षाच प्रथमच दर्शन प्राप्त झाले. त्यामुळे प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांनी समाधान व्यक्त केले आहे. ओएनजीसी प्रकल्पात मोराच दर्शन प्रथमच झाल्याने सदर मोरांच संरक्षण करण्यासाठी ओएनजीसी आणि वन विभागाने पुढाकार घ्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रंजन माळी यांनी व्यक्त केली आहे.

महिलांना लग्नाचे अमिष दाखवून हनी ट्रॅपमध्ये अडकवणारा भामटा गजाआड

दै.रायगड नगरी । पनवेल

उच्च शिक्षीत महिलांना लग्नाचे अमिष दाखवुन हनी ट्रॅप मध्ये अडकविणाऱ्या भामट्याला एपीएमसी पोलिसांनी मालाड मालवणी येथून जेरबंद केले आहे. महेश उर्फ करण मनोज गुप्ता, (३२ वर्षे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून तो एम ई (कॉम्पुटर) उच्चशिक्षित तरूण असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याबाबत हकीकत अशी की, दि. २९ जानेवारी २०२१ रोजी एपीएमसी पोलिस ठाणे हद्दीतील हॉटेल एजंट जॅक पामबीच गॅलेरीया मॉल येथुन यातील फिर्यादी महिला ह्या उबेर कॅबने आरोपीसह वाशीहून बेलापुर येथे जाण्यासाठी निघाल्या असता, आरोपीने सदर महिलेशी जवळीक करून लगट करण्याचा प्रयत्न केल्याने त्यास त्यांनी विरोध केला असता, आरोपी मनोज गुप्ता याने सदर महिलेस अश्लील शिवीगाळी करण्याचा प्रकार केला होता. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून एपीएमसी पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात भादंवि कलम ३५४ (अ), ५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा महिला अत्याचाराचा असल्याने पोलिस आयुक्त बिपीनकुमार सिंह, सह पोलिस आयुक्त डॉ. जय जाधव व पोलीस उपायुक्त सुरेश मेंगडे यांनी विशेष प्रयत्न करून सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत पोलिसांना सुचना केल्या होत्या. त्यानुसार एपीएमसी पोलिसांनी तांत्रिक तपास करून आणि गोपनीय बातमीदार यांच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपी महेश उर्फ करण मनोज गुप्ता, (३२ वर्षे), शिक्षण- एम ई (कॉम्पुटर) यास मालाड मालवणी येथुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, आरोपीने गुन्हा कबुल केल्याने त्यास नमुद गुन्ह्यात अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता, त्याला ४ दिवसांची पोलिस कोठडी मिळाली आहे. दरम्यान, आरोपी महेश उर्फ करण मनोज गुप्ता,हा जीवनसाथी या मेट्रोमोनीयल वेबसाईटवर करण या टोपन नावाने अकाउंट तयार करून त्यात स्वत:ला बिजनेसमॅन असल्याचे भासवुन तो उच्च शिक्षीत महिलांना लग्ना बाबत मागणी घालत असे. व त्यानंतर महिलांनी त्याच्या मोबाईल नंबरवर संपर्क साधल्यानंतर त्यांना तो पब, मॉल, रेस्टोरंट याठिकाणी भेटायला बोलावुन जवळीक साधत संबंध वाढवत असे.

तसेच आरोपी याने नामांकीत कंपनीत डाटा ऑपरेटरचे काम केलेले असुन आरोपीला सॉफ्टवेअरचे नॉलेज असल्याने तो वारंवार आपले मोबाईल सीम बदली करण्यासह एकदा वापरलेले सीम परत वापरत नसे. यासह तो स्वत:च्या मोबाईल सीमचे नेट न वापरता सर्व्हेर युज करून स्वत:च्या मोबाईल फोन व्दारे ओला उबेर हे वाहन बुक न करता इतर नावाच्या सीम कार्डचा वापर करत असे. आरोपीला संगणकाचे सविस्तर ज्ञान असल्यामुळे सदर ज्ञानाचा चुकीच्या ठिकाणी वापर करत असल्याच्या आदी विविध बाबी आतापर्यंतच्या पोलिस तपासातून उघड झाल्या असून सदर आरोपीने अशाप्रकारे अजून किती महिलांना फसविले आहे याबाबतचा अधिक तपास एपीएमसी पोलिसांकडून सुरु आहे.

तळा शहरात विनाकारण फिरताना आढळल्यास होईल कोरोना तपासणी

दै.रायगड नगरी । तळा

तळा शहरात विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांची तळा पोलीस प्रशासनाकडून कोरोना चाचणी करण्यात येत आहे. एकीकडे कोरोनाला रोखण्यासाठी राज्य शासनाने संचारबंदी सारखे नियम लागू केले असताना बाजारपेठ सकाळी ७ ते ४ वा.सुरू आहे. त्यानंतर बाजारपेठबंद झाल्यावरही तळा शहरात विनाकारण अनेक जण बाहेर फिरत असतात. या पार्श्वभूमीवरतळा शहरात दुपारच्या आणि संध्याकाळच्या वेळी रस्त्यावरून विनाकारण फिरणाऱ्यांची कोरोना चाचणी तळा पोलीस प्रशासनाने कडक धोरण राबविण्यात सुरुवात केली आहे.

कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यात गेल्या महिनाभरापासून कडक निर्बंध लागू करण्यात आले असताना तालूक्यातील कोरोना रूग्ण संख्येचा आलेख वाढत आहे. काल पर्यत ही संख्या ३८९ वर पोहोचली आहे. त्यामुळे भितीचे वातावण असून ही नागरीक अजूनही गांभीर्याने घेताना दिसत नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

अशा लोकांची महत्त्वाचा शहर प्रवेशद्वाराचे ठिकाणी किंवा त्याच ठिकाणी रस्त्यावर अँटीजन टेस्ट तळा पोलीस व आरोग्य विभागा कडून करण्यात येत आहे. काल आणि आज ४५ जणांची अँटीजेन्स टेस्ट करण्यात आली असून २ पॉझिटीव्ह असल्याचे आढळून आले आहेत. त्यामुळे खबरदार... नागरिक हो. घरीच राहा सुरक्षित राहा विनाकारण फिरताना आढळल्यास कोरोना चाचणीला सामोरे जावे लागणार आहे.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक सुरेश गेंगजे सहा.पोलीस निरीक्षक शिवराज खराडे, सोनाली जवादे, तळा पोलीस ठाणे कर्मचारी वर्ग, नगरपंचायतीचे राजेश शिंदे, आरोग्य विभागाचे मोहित मोरे व कर्मचारी आपले कर्तव्य पार पाडताना दिसत आहेत.

पोलादपूर तालुक्यात झाडे तोडण्यासाठी पूर्वसुचने विना विद्युतपुरवठा खंडीत

दै.रायगड नगरी । पोलादपूर

पोलादपूर तालुक्यासह शहरातील विद्युतपुरवठा महावितरणने विनापूर्वसुचना खंडीत केल्याने प्रस्तुत प्रतिनिधीने जिल्हाप्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणली. प्रशासनाने तातडीने संबंधितांना याबाबत सूचना दिल्याने सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास विद्युत पुरवठा सुरू करण्यात आला.

तालुक्यासह शहरातील विद्युत पुरवठा महावितरणने सोमवारी सकाळपासून अचानक पूर्वसूचना न देता खंडीत केला. यासंदर्भात अधिक चौकशी करता दोन महिन्यांपासून विजेच्या तारांचा स्पर्श होत असलेल्या झाडांच्या फांद्या कापण्यासाठी आखलेल्या कार्यक्रमानुसार सोमवारी दुपारी दोन वाजेपर्यंत विद्युतपुरवठा खंडीत करण्यात येणार असल्याची माहिती प्रस्तुत प्रतिनिधीस देण्यात आली. अशाप्रकारे विनापूर्वसूचना विद्युतपुरवठा बंद करण्याने ग्राहकांचे होणारे नुकसान महावितरणने भरून देण्याची गरज असल्याचे मत मांडून प्रस्तुत प्रतिनिधीने प्रशासनाचे लक्ष वेधले. यामुळे प्रशासनाने पूर्वसूचना दिल्याखेरिज विद्युतपुरवठा बंद करू नये, असे तातडीने महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सूद यांना कळविल्याने साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पोलादपूर शहर व परिसरामध्ये तातडीने विद्युतपुरवठा सुरू झाला.

महावितरणकडून ग्राहकांना विद्युतपुरवठा खंडीत करण्यापूर्वी पूर्वसूचना मोबाईल नंबरवर एसएमएसद्वारे दिली जाण्याची पध्दत गेल्या काही वर्षांपासून अस्तित्वात आली असून ग्राहकांना अचानक विनाकारण विनापूर्वसूचना विद्युतपुरवठा खंडीत झाल्यास अशा प्रकारे एसएमएस दिला जात नाही. मात्र, कोणतीही अचानक परिस्थिती नसतानाही सोमवारी सकाळी बंद झालेला विद्युतपुरवठा ग्राहकांना अडचणीचा ठरत असल्याचे दिसून येत होते. लॉकडाऊनसंदर्भातील नियमावली पाहता दुपारी २ वाजल्यानंतर बाजारपेठ बंद ठेवण्याचे निर्देश दिले असताना बाजारपेठ सुरू असताना विद्युतपुरवठा खंडीत ठेवण्याने ग्राहकांना मनस्ताप होत असल्याचे दिसून आले. यामुळे व्यापार उद्योग व सेवा यासाठी सकाळपासून दुपारी दुकान बंद होईपर्यंत विद्युतपुरवठा आवश्यक असताना दुपारी दोन वाजेपर्यंत विद्युतपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय ग्राहकांना मनस्ताप देणारा तसेच विजेचा व्यावसायिक वापर करण्यास बिनकामाचा ठरत होता.

यामुळे प्रस्तुत प्रतिनिधीने ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत तातडीने विद्युतपुरवठा सुरू करण्यास भाग पाडले.

दरम्यान, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सूद यांनी, मोबाईल नंबरवर एसएमएसद्वारे दिली जाणारी यंत्रणा बंद झाल्यानेच ग्राहकांना सोमवारी विद्युतपुरवठा खंडीत होणार असल्याची माहिती प्राप्त झाली नसल्याने तातडीने विद्युतपुरवठा सुरू करण्यात आल्याचे यावेळी प्रस्तुत प्रतिनिधीस सांगितले.

भाजपा नेते बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस विविध समजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून साजरा

दै.रायगड नगरी । पनवेल

कोकण म्हाडा मा. सभापती तथा भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य बाळासाहेब पाटील हे नेहमीच आपला वाढदिवस समाज हेच आपल कुटुंब असे मानून विविध सामाजिक उपक्रम करून साजरा करत असतात म्हणूनच गोरगरीब जनतेला आपलासा वाटणारा आणि नागरिकांसाठी प्रामाणिकपणे अहोरात्र झटणारा नेता म्हणून त्यांची जनमानसात ओळख आहे. सध्या कोरोना काळात एकूणच अनेकांची बिघडलेली आर्थिक घडी लक्षात घेता त्यांचा हा वाढदिवस बाळासाहेब पाटील लोकसेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजू कलाकार,रिक्षा चालक यांना मदत करून साजरा करण्यात आला.

या वेळी गरजू रिक्षा चालकांना मोफत सीएनजी कूपनचे वाटप केले गेले तसेच रंगभूमीच्या गरजू कलाकार बांधवांना मोफत धान्य किट दिले गेले. याच कार्यक्रमांतर्गत कोरोना संकट काळात स्वतः च्या जीवाची पर्वा न करता उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या डॉक्टर्स, नर्स,फार्मासिस्ट, टेक्निशियन व काही होतकरू तरुणांचा कोविड योद्धा म्हणून विशेष सन्मान आणि सत्कार करण्यात आला. हा मदत उपक्रम मा. उपमहापौर तथा भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयाजवळ साकारण्यात आला. या उपक्रमाचे सर्वच उपस्थितांनी आणि लाभार्थ्यांनी कौतुक केले व आभार केले.

अनेकांनी बाळासाहेब पाटील यांच्या सोबतचे जुने आठवणीतील किस्से सांगितले आणि बाळासाहेबांच्या काम करण्याच्या पद्धतीचे कौतुक केले. यावेळी मा.उपमहापौर तसेच भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, भाजपा युवा मोर्चाचे मा.सरचिटणीस समीर कदम, भाजयुमो प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रशांत कदम, देविदास खेडकर, उदय पाटील, भिमराव गेंड, प्रशांत पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

मुरुड नगरपरिषद क्षेत्रात अत्याधुनिक फिरत्या दवाखान्याद्वारे क्षयरोग चाचणी शिबिर संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान संस्थान (ICMR) व जागतिक आरोग्य संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच मुरुड-जंजिरा येथे क्षयरोग तपासणी शिबीर संपन्न झाले. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान व साधन सामुग्री सोबत घेऊन सर्व सुविधायुक्त फिरता दवाखाना कार्यरत आहे. या शिबिरात रुग्णांची मधुमेह व हिमोग्लोबिन चाचणी, डिजिटल एक्स-रे, थुंकी नमुना तपासणीसाठी CBNAAT ही उच्च दर्जाची चाचणी, वजन व उंची अशी संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली.

आतापर्यंत एकूण १५७ जणांनी या आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला. या मोहिमेंतर्गत जवळपास एक हजार जणांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. याचा उपयोग भारतातील क्षयरोगांची स्थिती समजण्यास व त्यांचा अभ्यास करण्यासाठी होणार आहे. यातील माहितीच्या आधारे क्षयरोगासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी शासनास मदत होणार आहे.

या शिबिराच्या व्यवस्थापनासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश अंधळकर, डॉ. शबाना खान, सामाजिक कार्यकर्ते श्री. राकेश गायकवाड, आरोग्य सेवक श्री.सागर रोकडे व इतर कर्मचारी असे जवळपास २० वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी कार्यरत आहेत.

मुरुड नगरपरिषद येथे सुरू असलेल्या या शिबिरास जिल्हा पी.पी.एम.समन्वयक श्री. एस.जी.दंतराव यांनी नुकतीच भेट देऊन या वैद्यकीय पथकाच्या कामाचे कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

माथेरानच्या जंगलात आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

दै.रायगड नगरी । कर्जत

माथेरानच्या जंगलात एका अनोळखी व्यक्तीचा मृत देह आढळून आल्याने परिसरात एकाच खळबळ उडाली आहे.या बाबत स्थानिक रहिवाशी हे रस्त्यावरून जात असताना दुर्गंधी येत असल्याने हा प्रकार समोर आला, सदर मयत व्यक्ती झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आले असून शरीर कुजलेल्या अवस्थेत दिसत आहे.

जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असणाऱ्या माथेरान घाट रस्त्यालगत दुर्गम परिसरातील गारबट गावाकडे जाणाऱ्या नागरिकांना परिसरात दुर्गंधी पसरलेली जाणवल्याने, रस्त्या लागत काही अंतरावर झाडाला लटकलेल्या अवस्थेत मानवी जातीचे शरीर दिसून आले.

हे शरीर पूर्ण कुजल्याने परिसरात दुर्गंधी सुटली होती.लागलीच ग्रामस्थानी या बाबत नेरळ पोलिसांना माहिती दिली. सदर घटनास्थळी नेरळ पोलीस हजार झाले असता, मयत व्यक्ती ही पुरुष जातीचे असून साधारण ८ ते १० दिवसांपूर्वी ते झाडाला लटकलेल्या अवस्थेत असल्याचे बोलले जात आहे. ऐकूनच या मयत व्यक्तीचा चेहरा पूर्णतः कुजलेला अवस्थेत दिसून येत असून डोक्यावरील केस देखील गळ्यापर्यंत पसरलेले दिसत आहे.सदर मयत व्यक्ती ज्या ठिकाणी लटकलेल्या अवस्थेत आढळून आली आहे त्या ठिकाणी बॅग आढळून आली असून त्या बॅग मध्ये काही लोखंडी शस्त्र देखील सापडली आहेत तसेच मयत व्यक्तीचा मोबाईल देखील पोलिसांना सापडून आला आहे.

काही दिवसांपूर्वी माथेरान ला चालत निघालेली ही व्यक्ती नागरिकांना अडवून स्वतःच्या नोकरी साठी विचारपूस करत होती तर भूक लागली म्हणून सांगत असल्याचे बोलले जात आहे. सदर घटने बाबत नेरळ पोलीस अधिक तपास करत असून, ही हत्या की आत्महत्या हे अद्याप समजू शकले नाही.

विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी

दै.रायगड नगरी । उरण

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष धंनजय गोंधळी यांनी केली आहे.

लोकनेते दि. बा. पाटील यांची जन्म व कर्मभूमी असलेल्या जागेवर नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ उभे रहात आहे. या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव दयावे अशी मागणी येथील प्रकल्पग्रस्तांकडून जोर धरू लागली आहे. त्यासाठी वेळप्रसंगी उग्र आंदोलन करण्याचा इशारा ही देण्यात आला आहे. कारण येथील प्रकल्पग्रस्तांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य पणाला लावले. यावेळी तो कोणत्याही आमिषाला बळी न पडता प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने शेवटच्या क्षणापर्यंत लढत होते. त्यामुळे अशा लोकनेत्याचे नाव विमानतळाला देण्यास हरकत नाही. उरण तालुका मराठी पत्रकार संघाच्या झालेल्या बैठकीत नवी मुंबई विमानतळास लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष धंनजय गोंधळी यांनी केली. या मागणीस उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी मान्यता दिली. यावेळी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष घन:श्याम कडू, पालू भिंडे, संजय गायकवाड, जे. एस. घरत, रा. ऊ. म्हात्रे व राजेंद्र नाईक आदी उपस्थित होते.

जाहीर प्रकटन

जाहीर प्रकरण करणाऱ्या कार्यालयाचे नांव : जिल्हा जलसंधारण अधिकारी मृत व जलसंधारण विभाग कळवा, ठाणे

जाहीर प्रगटन :- विषय-रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील तांबडी लघु पाटबंधारे या योजनेसाठी

संदर्भ :-
१) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-१७/एनसी-/२/आयडी-१२०५२/(४७)/२४५३/१२-१३/ दिनांक ०६/०२/२०१३
२) पर्यावरण व वन व जलवायू, परिवर्तन मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र भारत सरकार, नगापूर यांचे पत्र क्र.एफ नं.एफसी-६/एमएचबी-१७/२०१३ बीएचओ/५०५२ दि.०१/०३/२०१९
३) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-१७/एनसी-/२/आयडी-१२०५२/२०२०-२१/१२७३ दिनांक २५/०२/२०२१
४) पर्यावरण व वन व जलवायू, परिवर्तन मंत्रालय प्रादेशिक कार्यालय, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र एफ नं.६-एमएचबी-१७/२०१३ बीएचओ/७९६९ दि.२३/०३/२०२१
५) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-१७/नोसेल-/२/आयडी-१२०५२/१४००/२०२०-२१ दि.२६/०३/२०२१

वनमंजूरीचे आदेश :- महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासन आदेश क्र.एफ एल डी-१३१३/प्र.क्र.९२ / फ-१०/ दिनांक-३१/०५/२०२१

आदेश-प्रधान मुख्यावनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग (कार्यकारी अभियंता, (स्था.स्त.) विभाग) कडा कॉलनी कळवा यांना रायगड जिल्ह्यातील तांबडी लघु पाटबंधारे या योजनेसाठी २.८६ हे. राखीव वने वनजमीन वरील आदेशान्वये वळती करण्यात आलेली आहे. अटी व शर्ती वरील संदर्भानुसार व दिनांक ३१/०५/२०२१ च्या पत्रानुसार आहेत.

अनुसूची

गावाचे नाव	तालुका	जिल्हा	गट नंबर/कपार्टमेंट नंबर	वैधानिक दर्जा	एकूण क्षेत्रफळे (हेक्टर मध्ये)
तांबडी	रोहा	रायगड	गट नंबर-२७१ कंपार्टमेंट नंबर-२८१	राखीव वने	२.८६

तांबडी लघु पाटबंधारे योजना तालुका : रोहा, जिल्हा : रायगड हा जनहितार्थ प्रकल्प असून भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (साईट स्पेसिफिक) आहे. तसेच या प्रकल्पासाठी पर्यायी वनेत्तर जमीन उपलब्ध नसल्याची बाब विचारात घेण्यात येवून वन संवर्धन अधिनियम १९८०, च्या कलम-२ अन्वये २.८६ हे. वनजमीन वळती करण्यात आली आहे.

सदर माहिती जनहितार्थ सादर.

सही/-
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग, कळवा ठाणे

क्र.आरओसी-२०२१-२२/क्र.५/सी ७६४